**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. गौतम कृष्णा कांबळे
रा.निढोरी, ता.कागल,
जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०९+६३९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.०६.२००९ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. गौतम कृष्णा कांबळे
रा.निढोरी, ता.कागल,
जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री.एल.टी.भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०१.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०६.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०२.२००९ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.०५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२४.०६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री शंकर सहकारी पाणीपुरवठा संस्थेकडील पाणीपुरवठा व पाणीपट्टी याबाबतची माहिती पूर्ण दिली नाही. दिलेली माहितीही चुकीची आहे. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी माहिती देण्याचे आदेश संस्थेला दिले होते. त्यांनी स्मरणपत्रेही पाठविली. तरीही संस्थेने माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. गौतम कृष्णा कांबळे यांनी केले.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या स्तरावरील माहिती श्री.कांबळे यांना देण्यात आली आहे. अन्य माहिती संस्था स्तरावरील असून श्री.कांबळे यांचे मूळ अर्ज संस्थेकडे वर्ग करून, तसेच माहिती देण्याबाबत सूचना व प्रथम अपिलाच्या निर्णयात आदेश देऊनही संस्थेने माहिती दिलेली नाही. संस्थेची वार्षिक उलाढाल सुमार एक लाख रुपये आहे. संस्थेला शासनाने मदत दिलेली आहे. असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी केले. संस्थेस शासकीय अर्थसहाय्य प्राप्त असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार संस्थेने अपीलकर्त्यास माहिती पुरविणे बंधनकारक आहे. म्हणून श्री.कांबळे यांना माहिती तातडीने नि:शुल्क द्यावी, असा आदेश श्री.डोईफोडे यांनी प्रथम अपिलात दिला आहे.

श्री.कांबळे हे संस्थेचे सभासद नाहीत. ही संस्था मागासवर्गीयांची असून खोट्या तक्रारी करुन श्री.कांबळे संस्थेला त्रास देत आहेत. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ लागू नाही. तरीही काही माहिती श्री.कांबळे यांना दिली आहे, असे निवेदन संस्थेचे सचिव श्री.एकनाथ विठ्ठल कांबळे यांनी माहिती दिल्याच्या पूरक कागदपत्रांसह केले. संस्थेला समाजकल्याण खात्याकडून भाग भांडवलापोटी रु.२१,०००/- व जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून रु.२३,०००/- अनुदान मिळाले आहे. संस्थेचे वसूल भाग भांडवल रु.१,१७०/- इतके आहे. त्यामुळे संस्थेची निवडणूक घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असेही श्री.एकनाथ विठ्ठल कांबळे यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ लागू होतो. त्यामुळे संस्थेने माहिती दिली पाहिजे. मात्र संस्थेने काही माहिती दिली आहे. तसेच संस्थेने अपीलकर्त्याबाबत केलेल्या तक्रारीच्या संदर्भही लक्षात घेणे आवश्यक आहे. या स्थितीत, माहिती देण्याबाबत संस्थेने केलेल्या कार्यवाहीची चौकशी करुन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार पूर्तता न झाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.गौतम कृष्णा कांबळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे व आयोगाकडे केली. या तक्रारीची गंभीर दखल घेण्यात येत आहे. विहित मुदतीत अहवाल सादर न केल्याबद्दल श्री.डोईफोडे यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपिले अंशतः मान्य

२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार श्री शंकर सहकारी पाणी पुरवठा संस्था, निढोरी, ता.कगल,जि.कोल्हापूर या संस्थेचे सचिव श्री.एकनाथ विठ्ठल कांबळे यांनी अपीलकर्ता यांना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची तपासणी करुन अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबाच्या खुलाशासह अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी दि.२९.१२.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दिनांक : १७ / १२/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक, छत्रपती ताराराणी विकास आघाडी,शिरोळ,
मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सदस्य सचिव,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
पुणे विभाग, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सदस्य सचिव,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** -श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी<br>संस्थापक छत्रपती ताराराणी विकास आघाडी,शिरोळ,<br>मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | |

## विवेचन

कुमारी शिला गणपतराव धर्माधिकारी (पोतदार) यांनी मागितलेल्या जात पडताळणीबाबतची माहिती आपण मागितलेली होती. ती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विहित मुदतीत न दिल्याची व कोणताही निर्णय न कळविल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

कुमारी धर्माधिकारी यांचा अर्ज विभागीय जाती प्रमाणपत्र समिती, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला. त्याबाबतचा निर्णय या समितीकडून आपल्या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर कळविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या वतीने कळविण्यात आल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. समितीकडून निर्णय होण्याचा हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २८/१२/२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. विष्णू दत्तात्रय बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. विष्णू दत्तात्रय बर्वे<br>समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड<br>शहर महानगरपालिका, सांगली श्री. वाय.बी. माळी |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड<br>शहर, महानगरपालिका, सांगली<br>श्री. एस.टी. रसाळे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती ४५ दिवसापर्यंत दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दिलेल्या आदेशानुसारही माहिती मिळाली नाही. त्यानंतर काही मुद्दयांची माहिती देण्यात आली, परंतु आपल्या अर्जातील मुद्दा क्र. ५ ची योग्य माहिती दिली नाही. धोरणात्मक आणि आर्थिक विषय ऐन वेळच्या ठरावात घेता येत नसताना, त्याचप्रमाणे प्रशासनाची विषय पत्रिका नसताना ठराव करणे गैर आहे. या प्रकारे महानगरपालिकेने नागरिकांची व शासनाची फसवणूक केली आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विष्णू दत्तात्रय बर्वे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी श्री. बर्वे यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित माहितीसाठी शहर अभियंता, मालमत्ता व्यवस्थापक व सहाय्यक नगररचनाकार यांना दोन दिवसांत कळविले. या विभागाकडून माहिती वेळेत मिळाली नाही, त्यामुळे शहर अभियंता व मालमत्ता व्यवस्थापक यांना दि. ५.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी पत्र पाठविले व 'आपल्याकडून माहिती प्राप्त होत नाही तोपर्यंत होणाऱ्या विलंबास व दंडास आपण जबाबदार रहाल,' असे या पत्रात स्पष्ट केले होते. तरीही त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही. त्यानंतर श्री. बर्वे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली] मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. ३०.४.२००७ रोजी त्याचा निर्णय देऊन माहिती देण्यास आदेशित केले. तरीही माहिती न मिळाल्यामुळे श्री. बर्वे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. दरम्यान दि. २६.९.२००७ रोजी श्री. बर्वे यांच्यासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी समक्ष चर्चा करून सर्व माहिती त्यांना देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन उप आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी केले.

श्री. बर्वे यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ चे उत्तर देण्यात आले आहे. त्यातील कार्यवाहीचा तपशील कायदेशीर की बेकायदेशीर ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी शहर अभियंता, मालमत्ता व्यवस्थापक व नगररचनाकार यांच्याकडून त्यांनी ही माहिती मागविली होती. स्मरणपत्रही दिले होते. हे लक्षात घेता माहिती देण्यास ते जबाबदार ठरतात. विहित मुदतीत माहिती दिलेली नाही, हे स्पष्ट होते. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात. त्यावेळी दोन्ही पदांचा कार्यभार शहर अभियंता श्री. व्ही. एन. अष्टपुत्रे यांच्याकडेच होता. विलंबाबाबत खुलासा करावयाचा असल्यास त्यांनी तो एक आठवड्यात सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कोणताही खुलासा त्यांनी सादर केलेला नाही. मुद्दा क्र.५ च्या अनुषंगाने ऊर्वरित माहिती आपल्याला अद्याप मिळालेली नसल्याची तक्रार श्री. बर्वे यांनी दि. १४.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. ती रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती न देण्यास शहर अभियंता, मालमत्ता व्यवस्थापक व नगररचनाकार, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. व्ही. एन. अष्टपुत्रे हे जबाबदार असून त्यांना मूळ अर्जापासून म्हणजे दि. ५.३.२००७ पासून तीस दिवस वजा जाता दि. २६.९.२००७ पर्यंत १८६ दिवसांच्या विलंबाबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रतिदिन रु. २५०/- प्रमाणे (१८६ x २५०) रू.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम संबंधितांच्या डिसेंबर २००९ च्या जानेवारी २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करून दि. २८.१२.२००९ पर्यंत ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची

कार्यवाही आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी करावी. तसेच याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १७ १२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.वाय.बी.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.एस.टी.रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडील रिकन्सिलिएशनची दि.१.४.२००३ ते दि.३१.३.२००६ या काळातील माहिती दिली नाही. सन २००३ पर्यंतचे संपूर्ण रिकन्सिलिएशन झालेले नाही. स्थायी समितीसमोर याबाबतचा तपशील ठेवणे शक्य असताना तो ठेवला जात नाही. रिकन्सिलिएशन व्यवस्थित नसल्यास महानगरपालिकेच्या जमाखर्चाचा ताळमेळ लागणार नाही व म्हणून अशी माहिती तयार नसणे हे आर्थिक कारभाराबाबत संशय निर्माण करणारे आहे. हिशेबात सुमारे ४ ते ५ कोटी रूपयांचा घोळ आहे, हे लपवून ठेवण्यासाठी माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे यांनी केले.

सन १९९८ मध्ये महानगरपालिकेची स्थापना झाली, तेव्हापासूनची कागदपत्रे उपलब्ध होण्यास लागणाऱ्या अवधीमुळे व व्यापक स्वरूपाचे काम असल्यामुळे अडचणी येतात. परंतु २००३ पर्यंतचे रिकन्सिलिएशनचे काम पूर्ण झाले असून त्यानंतरच्या कामाच्या पूर्ततेची कार्यवाही चालू आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.एस.टी.रसाळे यांनी नमूद केले. ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.वाय.बी.माळी यांनी केले. एखादे चलन मिळू शकले नाही, तरी संपूर्ण वर्षाचे रिकन्सिलिएशन होऊ शकत नाही, याचा उल्लेख त्यांनी केला.

वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम ४ अन्वये महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहाराबाबतची रिकन्सिलिएशनसह सर्व माहिती महानगरपालिकेने स्वयंस्फूर्तीने जाहीरही करणे आवश्यक आहे, तथापी पूर्वी हे काम झालेले नसल्यामुळे व याबाबतची कार्यवाही चालू असल्याचे जन माहिती अधिकारी श्री.एस.टी.रसाळे व अपिलीय प्राधिकारी श्री.वाय.बी.माळी

यांचे प्रतिपादन लक्षात घेता सन २००३ पर्यंतची माहिती त्वरित द्यावी, त्यानंतर दोन महिन्यांनी पुढील एक एक वर्षाची माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेले निवेदन आयोग मान्य करीत असून त्यानुसार अपीलकर्त्यास नि:शुल्क माहिती द्यावी व त्या त्या टप्प्यावरील पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि, आपल्याला अद्यापपर्यंत सन २००३ पर्यंतची माहिती मिळाली नाही, अशी तक्रार श्री.बर्वे यांनी दि.११.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र सन १९९९-२००० ते २००३ अखेर रिकन्सिलिएशनची माहिती श्री.बर्वे यांना दि.१२.९.२००८ च्या पत्रान्वये दिल्याचे मुख्य लेखापाल, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका यांनी कळविले. ही माहिती तपासून आपण आपले मत कळवू , असे श्री.बर्वे यांनी दि.१३.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. दिलेल्या माहितीत तपशिलाच्या चुका आहेत, तसेच काही रकमा जुळत नाहीत, वेळोवेळीचा फरक एकत्र केलेला नाही, असे आक्षेप श्री.बर्वे यांनी दि.२२.९.२००८ च्या पत्रान्वये नोंदविले. मात्र याचा संबंध प्रामुख्याने रिकन्सिलिएशनच्या प्रशासकीय कार्यवाहीशी आहे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्या त्रुटींची दखल घेता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.वाय.बी.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.एस.टी.रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

उच्च न्यायालयातील दाव्यामध्ये सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिकेला झालेल्या दंडाबाबतची माहिती व दंड भरल्याची पावती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली. नेमका दंड कोणाला झाला याची माहिती आयोगाच्या आदेशानंतरही दिली गेली नाही. दोष नसलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्यावर ही माहिती मिळाली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विष्णू दत्तात्रय बर्वे यांनी केले. महानगरपालिकेला दंड झालेला नाही. उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र पाठविण्यास उशीर केल्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.एस.टी.रसाळे यांनी केले.

केलेल्या कार्यवाहीबाबतचे स्पष्ट उत्तर अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती देण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.वाय.बी.माळी यांनी दि.८.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छत्रपती ताराराणी विकास आघाडी,शिरोळ,
मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप सचिव,
महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
विधानसभा आश्वासन समिती,
महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२/**कोल्हापूर** |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** -श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी<br>संस्थापक, छत्रपती ताराराणी विकास आघाडी,शिरोळ,<br>मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०१.०८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.- |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.११.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीच्या दूषित पाण्यामुळे मासे मेल्याबद्दलच्या नुकसान भरपाईबद्दलची योग्य माहिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधानसभा आश्वासन

समिती, महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, विधानभवन, मुंबई यांनी दिली नाही. माहिती देण्याऐवजी पर्यावरण विभागाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यास आपल्याला कळविले. विधिमंडळात मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाच्या कार्यवाहीबाबत काय केले जाणार आहे. नुकसान भरपाई कशी व केव्हा दिली जाणार आहे हे कळणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केले.

सन २००५ मधील हा विषय असून श्री.धर्माधिकारी यांचा अर्ज प्राप्त झाल्यावर त्यांना शुल्क कळविण्यात आले. शुल्क भरल्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली. विधानसभेत दिलेल्या आश्वासनाबाबतची माहिती त्यांना कळविण्यात आली. नुकसानभरपाई आदीबाबतची पुढील कार्यवाही पर्यावरण व मत्स्यव्यवसाय विभागाने करावयाची असल्यामुळे तसे पत्र पर्यावरण विभगास देऊन श्री.धर्माधिकारी यांना त्यांची प्रत पाठविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी.विधानसभा आश्वासन समिती,महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, विधानभवन, मुंबई श्री.ता.नि.मिसाळ व अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ, सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२ श्री.विजय दि.जोशी यांनी लेखी नमूद केले. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २८/१२/२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.वैशाली चंद्रशेखर गुरव
द्वारा-श्री.आनंदा बाबाजी नांगरे
टीएस/३/२, खोडशी कॉलनी, मु.पो.विद्यानगर, ता.कराड, जि.सातारा  अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सातारा  उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००९ |

**३. उपस्थित**

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, सातारा श्री.शि.बा.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्त्या गैरहजर राहिल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्त्या सुनावणीलाही गैरहजर होत्या.

सहाय्यक पोलीस फौजदार श्री.जे.एस.पाटील यांच्याकडे आपण दि.१३.५.२००६ रोजी केलेल्या तक्रार अर्जाची प्रत व अनुषंगिक जाब जबाब आदि कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, या कारणावरून अपीलकर्त्या सौ.वैशाली चंद्रशेखर गुरव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सौ.गुरव यांनी त्यांचे पती, सासू-सासरे यांच्याविरूध्द दिलेल्या तक्रारीबाबतचा हा संदर्भ असून त्यांच्या अर्जाची प्रत आढळ होत नाही, हे त्यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे. तसेच याच संदर्भात त्यांनी केलेल्या विविध अर्जांनुसार सर्व माहिती त्यांना देण्यात आली. तथापि पोलीस ठाण्याच्या कागदपत्रांमध्ये आपला अर्ज मिळत नाही, या एकाच गोष्टीचा गैरफायदा घेऊन, स्वत:च्या अर्जाची प्रत स्वत:कडे असताना पोलिसांकडे मागून पोलिसांना अडचणीत आणण्याचा त्या जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या आग्रहानुसार संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल केला असल्यामुळे संबंधितांचे जाब-जबाब घेतलेले नाहीत, त्यामुळे त्याच्या प्रती देणे शक्य नाही, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, सातारा श्री.शि.बा.शिंदे यांनी केले. या संदर्भातील सौ.गुरव यांच्या तक्रारी, त्या अनुषंगाने पोलिसांनी केलेली कार्यवाही आदिंची तपशिलवार माहिती त्यांनी लेखी निवेदनात दिली.

अपीलकर्त्यास मूळ अर्जाच्या प्रतीव्यतिरिक्त सर्व माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे, असे वरील बाबी लक्षात घेता व कागदपत्रावरून स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२१.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. चंद्रकांत आण्णा देशमुख
मु.सह्याद्री नगर, पो.वखरी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालय, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३५/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता -** श्री. चंद्रकांत आण्णा देशमुख,
मु.सह्याद्री नगर, पो.वखरी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर,
जि.सोलापूर तर्फे प्रतिनिधी श्री.एस.व्ही.गायकवाड

**जन माहिती अधिकारी तथा** जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालय,
जि.सोलापूर श्री.तुषार एकनाथ ठोंबरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.०६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०६.०७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०७.०९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.०९.२००६ |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शासनाने आपल्याला दिलेल्या भूखंडाच्या कब्जेपावतीची प्रत जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालय, जि.सोलापूर यांनी दिली नाही. तसेच भूखंडाबाबत काढलेल्या दुरुस्ती आदेशानुसार कब्जेपावती कार्यालयाने केलेली नाही. मागणीनुसार आपल्याला आणखी १५०० चौ.फूट क्षेत्र मिळाल्यास आपली तक्रार राहणार नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री. चंद्रकांत आण्णा देशमुख यांनी केले.

श्री.देशमुख यांना कब्जेपावतीच्या नकले व्यतिरिक्तची सर्व माहिती विहित मुदतीत देण्यात आली. त्यांनी नमूद केल्याप्रमाणे २५०० चौ.फूट क्षेत्राचा कब्जा स्वतंत्रपणे दिला नसल्यामुळे तशी पावती झालेली नाही. त्यामुळे ती अभिलेखात नसून नक्कल देणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे कार्यालय, जि.सोलापूर श्री.तुषार एकनाथ ठोंबरे यांनी नमूद केले. याबाबतचा संपूर्ण तपशील लेखी निवेदनाद्वारे त्यांनी सादर केला.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून क्षेत्र मिळण्याबाबतची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २३/१२/२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. वि. द. बर्वे — अपीलकर्ता
समर्थ खादी भांडार, मेन रोड, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, द्वारा सिटी हायस्कूल सांगली-४१६ ४१६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सांगली शिक्षण संस्था, द्वारा सिटी हायस्कूल सांगली - ४१६ ४१६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३८ +३३९+ ३४० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. वि. द. बर्वे
समर्थ खादी भांडार, मेन रोड, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा — कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था, द्वारा सिटी हायस्कूल, सांगली-४१६ ४१६
श्री. यशवंत महादेव जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा — वरिष्ठ लिपिक, सांगली शिक्षण संस्था, द्वारा सिटी हायस्कूल, सांगली - ४१६ ४१६
श्री. श्रीपाद अनंत शिंदगी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सांगली शिक्षण संस्था, सांगली यांच्याकडे तीन अर्जांद्वारे आपण माहिती मागितली होती, परंतु त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्ज नाकारला. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(ज) अन्वये सांगली शिक्षण संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यामुळे हा अधिनियम संस्थेला लागू नाही, असे संस्थेने कळविले. संस्थेचा कारभार पारदर्शक नाही. प्रथम अपिलाची दखल घेतली गेली नाही. अनेक कोटी रूपयांची कामे केली असूनही निविदा काढलेल्या नाहीत. संस्थेच्या संचालकांच्या जवळच्या नातेवाईकांना कामे / कंत्राटे दिली असताना नातेसंबंध लपविण्याचे कारण काय? गैरकारभार उघड होऊ नये, म्हणून माहिती नाकारली जात आहे, त्यामुळे संस्थेवर व संस्थेचा कारभार पाहणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. वि. द. बर्वे यांनी केली.

संस्थेच्या वतीने प्रतिनिधीमार्फत बाजू मांडण्यासाठी पुढील तारीख देण्याची विनंती करण्यात आली. परंतु मूळ अर्जांना व आयोगाकडील अपिलांना झालेला कालावधी व या आधीच या संदर्भात झालेला पत्रव्यवहार लक्षात घेता आणखी मुदत देण्याची विनंती आयोगाने नाकारली. यापूर्वी दिलेले लेखी म्हणणे हेच आपले प्रतिपादन असल्याचे जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, सांगली शिक्षण संस्था, सांगली श्री. श्रीपाद अनंत शिंदगी यांनी सांगितले. तसेच माहितीच्या अधिकाराखाली श्री. बर्वे यांना माहिती नाकारली असली तरी 'आपण संस्थेचे सन्मानीय सभासद आहात, त्यामुळे सोबत माहिती जोडली आहे,' असे नमूद करून त्यांना माहिती तीस दिवसांत देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक श्री. श्रीपाद अनंत शिंदगी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या संदर्भात श्री. बर्वे यांच्या व्यक्तिगत वादाच्या माहिती पोटी ते या स्वरूपाचे अर्ज करीत आहेत, असे प्रतिपादन त्यांनी केले.

व्यक्तिगत वादातून परस्परांना शह-प्रतिशह देण्याचा भाग म्हणून माहितीच्या अधिकाराचा वापर होणे अपेक्षित नाही, याची जाणीव आयोगाने उभय बाजूंना दिली. तसेच संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू असून माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी आठ दिवसांत आयोगाला सादर करावा, त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

श्री. बर्वे यांनी मागितलेल्या अर्जानुसार वेळोवेळी दिलेली माहिती व काही मुद्दयांची माहिती देण्यास झालेल्या विलंबाची कारणे त्यांना त्या त्या वेळी स्पष्ट करण्यात आली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा राजीनामा, संचालक मंडळाचे पूर्वघोषित कार्यक्रम आदि बाबींमुळे विलंब झाला. तो मान्य करून श्री. बर्वे यांनी सर्व माहिती स्वीकारली. संस्थेने आता जन माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ ची अंमलबजावणी केली आहे. त्याबाबतची माहितीही श्री. बर्वे यांना देण्यात आली आहे, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी श्री. श्रीपाद शिंदगी व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यवाह, सांगली शिक्षण संस्था द्वारा सिटी हायस्कूल, गावभाग, सांगली श्री. यशवंत महादेव जोशी यांनी दि. ४.९.२००८ रोजी आयोगाला सादर केले.

संस्थेने दिलेला खुलासा व उत्तरे चुकीची, बेजबाबदारपणाची, बेकायदेशीर आहेत. सन २००० ते २००७ या काळातील मागणी केलेली कागदपत्रे संख्या ४०,००० असून त्याचे भरावयाचे शुल्क रू.८०,०००/- अशी बेजबाबदारपणाची उत्तरे दिली आहेत. शिक्षकांकडून निधी वसूल केला जात असताना कोणत्याही स्वरूपाचा निधी संकलन केला जात नाही, असे उत्तर दिले आहे. निविदा (टेंडर) न काढता संस्था कार्यभार कसा करते. संस्थेच्या निवडणुकीत आपण उमेदवारी अर्ज भरण्यास गेलो असता रोख रक्कम न घेता डी.डी. देण्यास सांगितले. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एकाला एक निर्णय व दुसऱ्याला दुसरा निर्णय, असे करणे योग्य नाही. बालवाडी प्रवेशाच्या देणग्या घेतल्या जात नाहीत, हे म्हणणे चुकीचे आहे. या संस्थेला आपण स्वतः वेळोवेळी बालवाडी प्रवेशासाठी हजारो रूपयांच्या देणग्या मिळवून दिल्या आहेत, अशा स्वरूपाचे मुद्दे श्री. बर्वे यांनी त्यांच्या दि.१७.९.२००८ च्या व अन्य निवेदनात मांडले आहेत व अद्यापही आपल्याला परिपूर्ण माहिती संस्थेने दिलेली नाही, अशी तक्रार केली आहे.

संस्थेने माहिती देण्याबाबत पारदर्शकतेची भूमिका घेतली नाही, असे विविध उत्तरातून दिसते. मात्र, श्री. बर्वे यांनी उपस्थित केलेले मुद्दे माहितीपेक्षा विविध बाबींच्या संदर्भात संस्थेने केलेल्या कारवाईच्या / कार्यवाहीच्या योग्या-योग्यतेच्या संदर्भातील आहेत. त्याचा निर्णय माहिती अधिकारा-अंतर्गत करता येणार नाही. भाष्य, खुलासा अशा स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मूळ अर्जानुसार देय ठरणारी

माहिती दिली नसल्याची श्री. बर्वे यांची तक्रार असल्यास व तसे त्यांनी नेमकेपणाने नमूद केल्यास संस्थेने माहिती देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत .

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा.डॉ.भिमाशंकर रूद्राप्पा पिरगोंडे
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर डॉ.बाबासाहेब कदम

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर प्रतिनिधी डॉ.बाबासाहेब कदम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.३.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांपैकी कोणीही हजर न झाल्याने दि. रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता प्रा.डॉ.भिमाशंकर रूद्राप्पा पिरगोंडे यांनी त्यांच्या वैद्यकिय देयकाच्या परिपूर्तीच्या अनुषंगाने विचारलेली माहिती त्यांना देण्यात आली असून देयकाची रक्कमही त्यांना अदा करण्यात आलेली आहे. या माहिती मागणीबाबत त्यांनी अनेक अर्ज केले असून माहितीबरोबरच रक्कम अदा करण्याची प्रशासकीय कार्यवाहीही दि.२५.७.२००६ रोजी पूर्ण करण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहसंचालक(उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांचे प्रतिपादन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ. अतुल जर्नादनराव खेरडे
द्वारा श्री. एस.बी. कुऱ्हाडे
सुसंगम, २०६बी वॉर्ड, सुधाकर नगर,
जवाहर नगर मेनरोड, कोल्हापूर-४१६ ०१२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त,
पुणे विभाग, औंध, पुणे-७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त,
कोल्हापूर जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - डॉ. अतुल जर्नादनराव खेरडे
द्वारा श्री. एस.बी. कुऱ्हाडे
सुसंगम, २०६बी वॉर्ड, सुधाकर नगर,
जवाहर नगर मेनरोड, कोल्हापूर-४१६ ०१२

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त,
पुणे विभाग, औंध, पुणे-७ श्री. एच. डी. गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त,
कोल्हापूर जि. कोल्हापूर डॉ. एम. ए. पाचपिंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.७.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, कोल्हापूर यांनी आपल्याला दिलेल्या शासकीय निवासस्थाना-बाबतची योग्य माहिती दिली नाही. पात्र कर्मचाऱ्यांना निवासस्थान दिलेले नाही. तसेच वाटपाच्या वेळी निवासस्थान सुस्थितीत आहे की नाही. अधिकारी कुटुंबासह त्यात राहू शकेल की नाही, हे पाहिले नाही. अशा निवासस्थानांचे वाटप करुन आपल्यासारख्या अधिकाऱ्यांवर अन्याय केला. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ. अतुल जर्नादनराव खेरडे यांनी केली.

निवासस्थान वाटपात झालेली चूक दुरुस्त करण्यात आली. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे हे प्रकरण गेले होते. त्यांच्या आदेशानुसार निवासस्थानांची पाहणी व दुरुस्ती करुन वाटप करण्याचे आदेश देण्यात आले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, कोल्हापूर श्री. डॉ. एम. ए. पाचपिंडे यांनी केले.

न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात आली. डॉ. खेरडे यांनी पुन्हा त्याच स्वरुपाची माहिती मागितल्यानंतरही सर्व अभिलेखांची त्यांच्या समक्ष पडताळणी करुन माहिती योग्य असल्याचे त्यांना दाखविले. अनुज्ञप्ती व सेवाशुल्क यांची वसूल केलेली रक्कम डॉ.खेरडे यांना परत करावी व पुढील वसुली थांबवावी, अशा सूचना जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, कोल्हापूर यांना देण्यात आल्या, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, पुणे विभाग, श्री. एच. डी. गायकवाड यांनी लेखी व तोंडी केले.

डॉ. खेरडे यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. अयोग्य व गैरसोईच्या निवासस्थानांचे वाटप आदी मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय विजय भिडे — अपीलकर्ता
११११, उत्तर शिवाजीनगर, गणपती गॅस
गोडाऊन जवळ, सांगली-४११ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. संजय विजय भिडे
११११, उत्तर शिवाजीनगर, गणपती गॅस गोडाऊन
जवळ, सांगली-४११ ४१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा — अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, सांगली
श्री. वाय. बी. माळी

**जन माहिती अधिकारी** तथा — सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, सांगली
श्री. एस. टी. रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.४.२००७ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

**विवेचन**

आपल्या मागणीनुसार अपेक्षित नमुन्यात माहिती दिली नाही, तसेच आस्थापना कक्षाकडील माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. संजय विजय भिडे यांनी केले.

अपीलकर्ता श्री. भिडे यांनी विशिष्ट तक्त्यात माहिती मागितली होती. अशा स्वरूपाची एकत्रित माहिती नसते. ती संकलित करून देण्यासाठी आणखी पंधरा दिवसांची मुदत मागितली होती. माहिती विविध खात्यांनुसार होती, तशी ती त्यांना देण्यात आली. माहिती संकलित करण्यास विलंब लागला, असे प्रतिपादन मुख्य लेखापाल, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी आयोगाला सादर करण्यात आलेल्या निवेदनात केले. उत्पन्नाची आस्थापनावरील खर्चाची टक्केवारी श्री. भिडे यांनी मागितली होती. ती संकलित करून, गणना करून देणे आवश्यक होते. ती माहिती नंतर देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. एस.टी. रसाळे यांनी केले.

माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी मुख्य लेखापाल यांना कळविले होते. तसेच होणाऱ्या विलंबामुळे दंडात्मक कारवाईस आपण जबाबदार राहाल, असेही मुख्य लेखपालांना कळविले होते. श्री. भिडे यांनी विस्तृत स्वरूपाची व आठ वर्षांच्या कालावधीची माहिती मागितली होती. प्रथम अपिलावरील आदेशानुसार ऊर्वरित माहिती दि. २५.४.२००७ रोजी देण्यात आली, असे लेखी निवेदन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. बाजीराव जाधव यांनी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. ११.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोरेश्वर धुंडीराज खाडिलकर
द्वारा साप्ताहिक यशोधरा
महानगरपालिका कार्यालयासमोर, तांदूळ
मार्केट, मिरज- ४१६ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४४ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. मोरेश्वर धुंडीराज खाडिलकर, द्वारा साप्ताहिक यशोधरा, महानगरपालिका कार्यालयासमोर, तांदूळ मार्केट, मिरज- ४१६ ४१०

**अपिलीय प्राधिकारी** तथा — अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. वाय. बी. माळी

**जन माहिती अधिकारी** तथा — सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. एस.टी.रसाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.४.२००७ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी अपुरी माहिती दिली. माहिती उपलब्ध उपलब्ध होताच कळविण्यात येईल, असे कळवून त्यांनी १४ पैकी ५ मुद्दयांबाबत उत्तर दिले. परंतु ऊर्वरित माहिती नंतरही दिली नाही. उपलब्ध असणारी माहिती दोन दिवसांत द्यावी व द्यावयाची राहिलेली माहिती संबंधितांकडून उपलब्ध करून १५ दिवसांत द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दिले. त्यानंतरही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मोरेश्वर धुंडीराज खाडिलकर यांनी केली.

उपलब्ध असलेली माहिती मुदतीत देण्यात आली, मात्र विविध विभागांकडून ही माहिती संकलित करावयाची असल्यामुळे विलंब लागला, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. एस.टी. रसाळे यांनी केले. मात्र संपूर्ण माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, माहिती देण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या खुलाशासह जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी आयोगाला सादर करावा व ऊर्वरित माहिती अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि अशा स्वरूपाचा अहवाल वारंवार स्मरणपत्र देऊनही आयोगास अद्याप देण्यात आलेला नाही, ही गंभीर बाब आहे. त्याबाबत संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर यांना संपूर्ण माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दि. ३०.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार संबंधितांचा खुलासा सादर करण्यात आलेला नाही. त्याबाबत माहिती देण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपील ), १९८१ नुसार प्रशासकीय कारवाई करुन आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दि. ५.१.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

पुणे
दि. १७.१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोरेश्वर धुंडीराज खाडिलकर
द्वारा साप्ताहिक यशोधरा
महानगरपालिका कार्यालयासमोर, तांदूळ
मार्केट, मिरज- ४१६ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. वाय. बी. माळी — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. शिवाजी तुकाराम रसाळे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मोरेश्वर धुंडीराज खाडिलकर<br>द्वारा साप्ताहिक यशोधरा<br>महानगरपालिका कार्यालयासमोर, तांदूळ मार्केट,<br>मिरज- ४१६ ४१० |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड<br>शहर महानगरपालिका, सांगली<br>श्री. वाय. बी. माळी |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड<br>शहर महानगरपालिका, सांगली<br>श्री. शिवाजी तुकाराम रसाळे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.४.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली अस्तित्वात आल्यापासून महानगरपालिका आयुक्त व महापौर आदींसाठी उपलब्ध करून दिलेल्या निवासी जागेबाबतची माहिती आपण मागितली होती. त्यातील केवळ पाच महिन्यांची माहिती देण्यात आली व ऊर्वरित माहिती उपलब्ध होताच कळविण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी कळविले. राहिलेली माहिती संबंधितांकडून उपलब्ध करून घेऊन १५ दिवसांत नि:शुल्क पुरवावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी देऊनही माहिती मिळाली नाही. महानगरपालिकेसारख्या सार्वजनिक संस्थेत वर्षानुवर्षाची अशी माहिती उपलब्ध नसावी, तसेच दीड वर्षाच्या कालावधीतही ती एकत्रित करून दिली जात नाही, हे आक्षेपार्ह आहे. आपल्याला परिपूर्ण माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर यांनी केली.

उपलब्ध माहिती श्री. खाडिलकर यांना त्वरित देण्यात आली, आयुक्त निवासाबाबतची माहिती सन १९९८ पासूनची असून एकत्रित स्वरूपात उपलब्ध नव्हती. ती संकलित करण्यास विलंब लागला, तशी कल्पना श्री. खाडिलकर यांना देण्यात आली होती, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री. एस.टी. रसाळे यांनी केले. माहिती चार दिवसांत नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित ठरावाच्या प्रतींसह संपूर्ण माहिती श्री. खाडिलकर यांच्या प्रतिनिधींना देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, श्री. एस.टी. रसाळे यांनी दि. २.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११ .१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोरेश्वर धुंडीराज खाडिलकर — अपीलकर्ता
द्वारा साप्ताहिक यशोधरा
महानगरपालिका कार्यालयासमोर, तांदूळ
मार्केट, मिरज- ४१६ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४६ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. मोरेश्वर धुंडीराज खाडिलकर
द्वारा साप्ताहिक यशोधरा
महानगरपालिका कार्यालयासमोर, तांदूळ मार्केट,
मिरज- ४१६ ४१०

**अपिलीय प्राधिकारी** तथा — अप्पर जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. विश्वजीत माने

**जन माहिती अधिकारी** तथा — उप विभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज, जि. सांगली श्री. उत्तम पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.५.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज यांनी अपुरी माहिती दिली. तहसीलदार, मिरज यांच्याकडे अपील करणे आवश्यक असल्याचे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांनी अपील निकाली काढले. त्यानुसार केलेल्या अपिलाची तहसीलदार, मिरज यांनी दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मोरेश्वर धुंडिराज खाडिलकर यांनी केली.

श्री. खाडिलकर यांनी उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज यांच्याकडे अर्ज केला होता. माहिती तहसील कार्यालयाच्या कक्षेतील असल्यामुळे अर्ज त्या कार्यालयाकडे वर्ग करून तसे श्री. खाडिलकर यांना कळविण्यात आले. तहसीलदार, मिरज कार्यालयाचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांनी माहिती दिली. निवासी नायब तहसीलदारांच्या उत्तराविरूध्दचे अपील तहसीलदार, मिरज यांच्याकडे करणे आवश्यक होते, परंतु श्री. खाडिलकर यांनी अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे व नंतर राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. तथापि श्री. खाडिलकर यांना मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज श्री. उत्तम पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता, अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ११.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ